ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९२५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३३ | पुणें, बुधवार तारीख ९ जानेवारी, १९५७ | अंक २

## विविध माहिती

**हंगेरीला रशिआची मदत**—हंगेरींतील बंडाव्यामुळें त्या देशाची आर्थिक स्थिति डबघाईला आलेली आहे. ती सावरून पुन्हां स्थिरस्थावर करण्यासाठीं रशिआनें हंगेरील बरेंच मोठें कर्ज देऊं केलें आहे. त्यापैकी ५ कोटी डॉलर्स दुर्मिळ चलनाच्या रूपांत मिळणार आहे. हंगेरीला सुमारें ४० कोटी डॉलर्सची जरूर आहे. ह्या चलनामुळें पाश्चिमात्य राष्ट्राकडून माल विकत घेणें शक्य होईल.

**रेल्वेच्या तिकिटांचा तुटवडा**—सौराष्ट्रामधील कित्येक छोट्या रेल्वेस्टेशनांवर जरूर तीं तिकिटें लोकांना मुळींच मिळूं शकत नाहीत, अगर त्यांचा तुटवडा जाणवत आहे. गेल्या कांहीं महिन्यांपासून रेल्वेचे अधिकारी प्रवाशांना भाड्याचा आकार घेऊन पावत्या देत असतात असें समजतें. पण खेडूत लोक पावत्यांवर अविश्वास दाखवीत आहेत.

**सुरत येथें एंजिनिअरिंग कॉलेज**—सुरत येथील कांहीं नागरिकांनीं सभा भरवून १९५७ च्या जून महिन्यापासून शहरांत नवें एंजिनिअरिंग कॉलेज स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉलेजसाठीं ५० लाख रुपये भांडवली खर्च लागेल. त्याशिवाय दरसाल ५ लाख रुपये खर्चासाठीं लागतील. जिल्हा-लोकल बोर्डातर्फे कॉलेजला ५ लाख रुपयांची देणगी जाहीर करण्यांत आली आहे.

**मुलींच्या शिक्षणाला अग्रहक्क**—भारतीय सरकारनें मुलींच्या शिक्षणाचा विस्तार करण्यासाठीं खास उपाय योजण्याचें ठरविलें आहे. प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज व शिक्षकांच्या शिक्षणाच्या पातळीवर हे उपाय योजले जाणार आहेत. राज्य-सरकारांना ह्यासंबंधीं सूचना देण्यांत आल्या असून मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्यानें ह्या कामासाठीं ३·५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**इराणला जागतिक बँकेचें कर्ज**—इराणच्या कनिष्ठ सभागृहानें जागतिक बँकेपासून ७० लाख डॉलर्स कर्ज घेण्याची परवानगी देणारें बिल मंजूर केलें आहे. बँकेनें ह्यापूर्वीच कर्ज मंजूर केलें आहे. तेलाच्या खाणींचा विकास करण्यासाठीं कर्जाचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**रायपूरला धान्याची मोठी वखार**—शेतकऱ्यांना आपलें धान्य विकण्यास मदत व्हावी म्हणून मध्यवर्ती सरकारनें रायपूर येथें धान्यांचा साठा करण्यासाठीं खूप मोठी वखार बांधण्याचें ठरविलें आहे. वखारींत २० लाख टन धान्य भरून ठेवतां येईल. शेतकऱ्यांना धान्याच्या तारणावर कर्ज देऊन त्यांचें धान्य वखारींत ठेवण्यांत येईल व नंतर वाजवी किंमतीस तें विकण्यांत येईल. वखार १२ एकर जमिनीवर बांधली जाईल.

**उत्तर प्रदेशांतील नवें धरण**—बनारसपासून ४० मैलांवर चंद्रप्रभा ह्या ठिकाणीं बांधलेल्या नव्या धरणाचा उद्घाटन-समारंभ नुकताच झाला. हें धरण बांधण्याच्या कामांत राज्यांतील २,००० कैद्यांनीं भाग घेतला होता. धरणाजवळ एक विश्रांति-बंगला बांधण्यांत आला असून बोटीनें सहल करण्याची व मच्छीमारांची सोयहि करण्यांत आली आहे.

**ब्रिटनमध्यें किंमत वाढली**—ब्रिटनमधील चहाच्या कित्येक कंपन्यांनीं किरकोळ विक्रीच्या दरांत वाढ केली आहे. सुएझ कालवा बंद पडल्यामुळें कित्येक देश लंडनच्या चहा बाजारांत खरेदी करूं लागले आहेत. त्यामुळें किंमती चढण्यास अधिकच मदत होत आहे. गेल्या वर्षीच्या मानानें चालू वर्षीं चहाच्या किंमती बऱ्याच जास्त आहेत.

**खताच्या कारखान्याचें उत्पादन**—सरकारी मालकीच्या सिंद्री येथील खताच्या कारखान्याचें १९५६ सालामधील उत्पादनाचें उद्दिष्ट ३,२०,००० टन ठरविण्यांत आलें होतें. कारखान्यानें गेल्या सालीं उद्दिष्टापेक्षा १,७२५ टन अधिक अमोनिअम सल्फेटचें उत्पादन केलें. ठरल्यापेक्षा अधिक उत्पादन करण्याचा कारखान्याचा हा लागोपाठ तिसरा प्रसंग आहे.

**अफगाणिस्थानचा पंचवार्षिक कार्यक्रम**—अफगाणिस्थानच्या सरकारनें आर्थिक विकासासाठीं पंचवार्षिक कार्यक्रम तयार केला आहे. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठीं लागणारा पैसा अंशतः अमेरिकेकडून आणि अंशतः रशिआकडून मिळणार आहे. एकूण ४३ कोटी डॉलर्स भांडवलाची सरकारला गरज आहे. खाजगी भांडवलदार अटी न घालतां भांडवल पुरविण्यास तयार असतील तर सरकारची ना नाहीं.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**जुनागड येथें संशोधन-केंद्र**—मुंबई सरकारनें जुनागड येथें शेतीविषयीं व गुरांच्या पैदाशीविषयीं संशोधन करण्यासाठी एक केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. केंद्राच्या स्थापनेसाठी ४३ लाख रुपये खर्च येईल व तें सरदार पटेल ह्यांच्या नांवानें काढण्यांत येईल. ही योजना पूर्वीच्या सौराष्ट्र सरकारनें तयार केली होती. मुंबईच्या सरकारनें २ हजार एकर जागाहि ताब्यांत घेतली आहे.

**कालवा बंद झाल्यानें नुकसान**—सुएझचा कालवा वाहतुकीस बंद झाल्यामुळें इजिप्तला रोज १० लाख पौंड नुकसान सोसावें लागत आहे, अशी माहिती कालव्याच्या इजिप्शिअन अधिकाऱ्यांनीं जाहीर केली आहे. कालव्याची सफाई लवकरांत लवकर होणें इजिप्तच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. कालवा साफ करण्याचें काम मे अखेर पुरें होईल, असें समजतें.

**अणुशक्ति मंडळाचा खर्च**—अमेरिकेच्या अणुशक्ति-मंडळानें आपला १० वा वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालांतील माहितीप्रमाणें अणुविषयक संशोधन व इतर कामासाठी मंडळाला दरसाल २०० कोटी डॉलर्स भांडवली खर्च येत आहे. १९४७ सालीं मंडळानें १२० कोटी डॉलर्स भांडवल केला होता. हा खर्च वाढता वाढता आतां ७०० कोटी डॉलर्स इतका झाला आहे.

**बसचें भाडें चेकनें**—नवीन वर्षाच्या प्रारंभापासून लंडनमध्यें वाहतूक करणाऱ्या बसेसचे दर २॥ पेन्सवरून ३ पेन्सपर्यंत वाढविण्यांत आले. ता. १ जानेवारीला बसमधून जाणाऱ्या एका सेवानिवृत्त कामगारानें दर वाढीच्या निषेधार्थ भाड्यासाठी ३ पेन्सचा चेक दिला. चेक स्वीकारण्यांत आला. चेकच्या पाठीमागें त्यानें असें लिहिलें होतें कीं, दर वाढीमुळें पेन्शनरांना व वृद्धांना आपल्या शिलकेंतून पैसे काढल्याशिवाय प्रवास करणें अशक्य झालें आहे.

**अणुशक्तीवर चालणारी व्यापारी बोट**—ब्रिटनच्या अणुशक्ती संशोधन खात्यांतील शास्त्रज्ञ अणुशक्तीवर चालणारी वाहतुकीची व्यापारी बोट तयार करण्याच्या खटपटींत आहेत. बोट आर्थिक दृष्ट्या परवडणारी व निर्धोक असावी म्हणून प्रयत्न करण्यांत येणार आहे. ह्यापूर्वीं अमेरिकेनें 'नॉटिलस' ही पाणबुडी अणुशक्तीवर चालविण्यांत यश मिळविलें आहे.

**बोटी बांधण्याचा आणखी एक कारखाना**—भारतांत आणखी एक बोटी बांधण्याचा कारखाना बांधण्यासाठी ब्रिटननें कोलंबो योजनेस अनुसरून मदत देण्याची तयारी दाखविली आहे. भारतीय सरकारनें प्राथमिक अहवाल करणाऱ्या ब्रिटिश तज्ज्ञांच्या आगमनास आपली अनुकूलता दर्शविली आहे. सध्यां विशाखापट्टम् येथील कारखान्यांत १०,००० टन वजनाच्या बोटी बांधण्यांत येतात.


मराठी भाषिक सर्वसामान्य जनतेच्या उपयोगाकरितां

**नवा हिंदु वारसा कायदा**

(१९५६ चा)

लेखक : विठ्ठल रामचंद्र फडके, एम्. ए., एलएल्. बी., वकील (रि. सि. जज्ज) पुणें.

हिंदु स्त्री-पुरुषांच्या वारसा हक्कांत, मिळकतीवरील स्त्रियांच्या हक्कांत व मृत्युपत्र करण्याच्या हक्कांत झालेले क्रांतिकारक बदल सोप्या भाषेंत समजावून देणारें हें एकमेव पुस्तक प्रकाशकाकडे व सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे विकत मिळेल. [ किंमत १। रुपया, शिवाय टपालखर्च ]

प्रकाशक : हे. वि. फडके,
श्रीकृष्णकुंज, ८२० भां. इं. रोड, पुणें ४.

**कण आणि क्षण**

ह्या अत्यंत लोकप्रिय (दोन वर्षांत दोन मराठी व दोन गुजराती आवृत्त्या) पुस्तकाचे कर्ते
श्री. श्री. वा. काळे संपादक, "अर्थ" ह्यांचें

**पुढे पाऊल**

चित्ताकर्षक विवेचन असलेल्या मार्गदर्शक लघुनिबंधांचा संग्रह.

पृ. सं. १३२ ] आर्यभूषण प्रेस, पुणें ४. [ किंमत २ रु.

*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***

(शिड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, (फोन २७६३) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, (फोन ३०४०८)

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे | उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१२५
खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज २॥ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ९ जानेवारी, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## केरळमधील काजूचे कारखाने

त्रावणकोर कोचीन राज्यांतील काजूचे कारखाने बंद करण्यांत आल्यामुळें जवळ जवळ ४०,००० कामगारांवर बेकारीला तोंड देण्याचा प्रसंग आला होता. ह्या परिस्थितीवर सरकारनें आपलें लक्ष एकसारखें ठेवलें होतें. कारखान्यांपैकी बहुतेक कारखाने कामाचा हंगाम संपल्यामुळें बंद करण्यांत आले होते. त्यापैकी बरेच कारखाने परत सुरू करण्यांत येणार आहेत. पण कांहीं मात्र बंदच राहतील. या कारखान्यांतून काम करीत असलेल्या कामगारांना ताबडतोब कामावर घेणें कठीण जाणार आहे. अशा कामगारांना रोजगार पुरविण्यासाठी राज्य-सरकारनें कामगारांची एक सहकारी संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. सुरवातीला १,५०० कामगारांना संस्थेचे सभासद करून घेण्यांत येईल. संस्थेला लागणारें भांडवल पुरविण्यासाठी सरकारकडून कर्ज देण्यांत येणार आहे. पैशासंबंधीची व्यवस्था व मदत एका बँकेमार्फत करण्यांत येणार आहे. जे कारखाने चालू करतां येत नाहींत त्यांची व्यवस्था काजूच्या कारखान्यांच्या इतर मालकांनीं आपल्याकडे घ्यावी ह्याविषयीं त्यांचें मन वळविण्याचे प्रयत्न सरकारतर्फे करण्यांत येत आहेत. कांहीं कारखानदारांनीं आपल्या कारखान्यांचा विस्तार करून, बंद पडलेल्या कारखान्यांतील कामगारांना कामावर घेण्याचें आश्वासनहि दिलें आहे. गेले चार महिने केरळ राज्यांतील बरेच काजूचे कारखाने बंद आहेत.कारण त्यांना लागणारा कच्चा माल पुरेशा प्रमाणांत उपलब्ध नव्हता. क्विलॉन शहराच्या आसपास असलेल्या कारखान्यांनाहि ह्या परिस्थितीची झळ लागली होती. कारखाने उघडण्याविषयीं कामगारांनीं सत्याग्रहहि चालविला होता. राज्य सरकारच्या प्रयत्नानें आतां बहुतेक कामगारांना रोजगार मिळेल असें वाटतें.

## राज्यांच्या शेतकी-मंत्र्यांची परिषद

भारतामधील राज्यांच्या शेतकी-मंत्र्यांची परिषद दिल्ली येथें दोन दिवस भरली होती. मध्यवर्ती सरकारच्या शेतकी खात्याचे मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख अध्यक्षस्थानीं होते. शेतीचें उत्पन्न वाढविण्यासाठी योजावयाच्या उपायांचा परिषदेंत विचार करण्यांत आला आणि उत्पादनाचीं उद्दिष्टें अधिक उच्च ठेवण्याचीहि चर्चा करण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जपानी पद्धतीनें भातशेतीची लागवड करण्यासाठी ४० लाख एकरांचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. परिषदेनें ८० लाख एकर जमिनींत ह्या पद्धतीनें भातशेती करण्यांत यावी असें सुचविलें आहे. उसाचें उत्पादन वाढविण्याच्या आधुनिक उपायांचा प्रसारहि अधिक नेटानें करण्याचें ठरविण्यांत आलें. तथापि, परिषदेंत शेतीच्या मालाच्या किंमतीविषयीं झालेली चर्चा व तत्संबंधीं झालेला ठराव अधिक महत्त्वाचा आहे. भारतासारख्या शेतीप्रधान देशांत शेतीच्या मालाच्या किंमतीला असणारें विशेष महत्त्व स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. देशांतील बहुसंख्य जनता शेतीच्या व्यवसायावर अवलंबून असल्यामुळें शेतीच्या मालाच्या किंमती प्रमाणाबाहेर पडल्यास केवळ शेतकऱ्यालाच धक्का बसतो असें नव्हे. उतरत्या किंमतीचे परिणाम कमीअधिक प्रमाणांत सर्व अर्थव्यवस्थेवर होतात, आणि आर्थिक जीवनांत एकप्रकारची अस्वस्थता व अनिश्चितता निर्माण होते. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांत शेतीच्या मालाच्या किंमती प्रमाणाबाहेर घसरूं न देण्यासाठी उपाय योजण्यांत येतात. भारतांत असे उपाय योजणें कठीण असले तरी त्या दिशेनें कांहीं वाटचाल करणें आवश्यक भासूं लागलें आहे. दिल्ली येथें भरलेल्या परिषदेंत अशी शिफारस करण्यांत आली कीं कांहीं प्रमुख प्रकारच्या शेतीच्या मालाच्या किमान किंमती ठरविण्यांत याव्या.

## समतोल आर्थिक विकासाची जरूरी

इंडिअन कॉमर्स असोसिएशनची १० वी वार्षिक परिषद रांची येथें भरली होती. कलकत्ता विद्यापीठाच्या कॉमर्सच्या शाखेचे प्रमुख प्रा. एस. के. बसू हे परिषदेचे अध्यक्ष होते. परिषदेला निरनिराळ्या विद्यापीठांचे व व्यापारी संस्थांचे २०० वर प्रतिनिधी हजर होते. प्रो. बसू ह्यांनीं आपल्या भाषणांत नव्या कराबद्दल इषारा दिला. ते म्हणाले कीं, नवीन कर बसविण्याबाबत सध्या उत्साह दाखविला जात आहे. पण ह्या करांपैकी कांहीं कर असे आहेत कीं त्यांच्या आकारणीमुळें खाजगी मालकीच्या भांडवलाच्या गुंतवणुकीवर अनिष्ट परिणाम होतील. ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. भारतीय सरकारचे व्यापार मंत्री श्री. डी. पी. करमरकर ह्यांनीं परिषदेंत भाषण केलें. ते म्हणाले कीं भारतीय अर्थव्यवस्थेला धक्के न देतां विकास साधावयाचा असेल तर शेती व उद्योगधंदे ह्या दोन्हींच्या वाढींत समतोलपणा राखला पाहिजे. कोणत्याहि देशाच्या आर्थिक विकासाचा इतिहास आपण पाहिला तर असें दिसतें कीं विकासाच्या प्राथमिक अवस्थेंत लोकांच्या मूलभूत गरजांना अग्रहक्क द्यावा लागतो. लोकांच्या प्राथमिक गरजा पुरेशा प्रमाणांत भागवून त्या पायावर जो आर्थिक विकास साधण्यांत येतो तो स्थिर स्वरूपाचा असतो. भारताचें राष्ट्रीय उत्पन्न फार कमी आहे आणि साधन संपत्तीहि मर्यादित आहे. अर्थातच जरूर त्या भांडवलाचा संचय करण्याची लोकांची पात्रताहि मर्यादितच आहे. औद्योगिक विभागाच्या विकासाची गति फार असेल तर प्राथमिक गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष होतें, समतोलपणा बिघडतो आणि मानसिक अस्थिरताहि निर्माण होते.

**प्रवासासाठी सवलती**—परदेशांतून रशिआला भेट देणाऱ्या प्रवाशांना सवलती देण्यांत येणार आहेत. त्यांना रशिआंतील पहिल्या ६०० मैलांचा प्रवास फुकट करतां येईल आणि त्यापुढील प्रवासासाठी निम्म्या दरानें भाडें द्यावें लागेल. त्याशिवाय विद्यार्थी, कामगार व बेताच्या आर्थिक स्थितींतील इतर लोकांना भाड्यांत आणखी २५ टक्के सूट देण्यांत येणार आहे.

# नवीन कंपनी कायदा

## गैरसोय व कुचंबणा करणारीं जाचक कलमें : तांतडीनें दुरुस्तीची आवश्यकता

( लेखक : श्री. नारायण विनायक भोंडे, पुणें )

१९५६ चा नवीन कंपनी कायदा एप्रिलपासून अंमलांत आला आहे. ह्यांत ६५८ कलमें व ४ परिशिष्टें असून १३ विभागांत त्याचें विभाजन झालें आहे. १९१३ च्या कायद्यांतील कित्येक 'रेग्युलेशन'चा व 'इंग्रजी स्टॉक एक्स्चेंज'च्या नियमाचा अथवा संकेताचा ह्या कायद्यांत समावेश केला असून कंपन्यांवर, त्यांच्या संचालक-मंडळांवर, व्यवस्थापकांवर किंवा मुनिमांवर अनेक बंधनें घातलीं आहेत. उद्योग-व्यवसायांच्या प्रगतीस, कंपन्यांच्या विकासास व सामुदायिक हितसंवर्धनास हीं बंधनें कितपत पोषक ठरतील अगर त्यांच्या संकोचास कारणीभूत होतील, हें कालावधीच ठरविणार आहे. कदाचित् हें निर्बंध राष्ट्रीयीकरणाचे अग्रदूतहि असतील.

### 'कोरम' विषयक तरतूद

ह्या नवीन कायद्यांतील पुष्कळ तरतुदी संरक्षक व सावधगिरीच्या आहेत, तर कांहीं चमत्कारिक अगर प्रतिगामी व कांहीं जाचक व खर्चिक दिसतात. उदाहरणार्थ, सार्वजनिक कंपनीच्या सदस्यांची अथवा संचालक मंडळाच्या सभासदांची केवढीहि मोठी संख्या असली तरी फक्त पांच उपस्थित सदस्य सर्वसाधारण सभेची गणपूर्ति करूं शकतात व खाजगी कंपनीच्या सभेच्या वेळीं फक्त दोन सदस्य हजर असले कीं गणसंख्या पुरेशी (कोरम) होते, असें कलम १७४ नें जाहीर केलें आहे. यापेक्षा जास्त सदस्य उपस्थित असल्याशिवाय गणपूर्ति होणार नाहीं अशी तरतूद कंपनीच्या नियमांत समाविष्ट करण्याची कायद्यानें मुभा दिली आहे, नाहीं असें नाहीं; पण कायद्याचा स्पष्ट आदेश व मुभा बाजूस सारून कोणती कंपनी अथवा संचालक-मंडळ हें बंधन स्वतःवर लादून घेईल ? वास्तविक संचालक-मंडळाच्या संख्येपेक्षा निदान एकतरी जास्त सदस्याची उपस्थिति गणपूर्तीस आवश्यक ठेवावयास पाहिजे होती. पण आतां उपस्थित सदस्य फक्त पांचच असले तरी ते गणपूर्ति करूं शकल्यामुळें सर्वसाधारण सभेचें काम खुशाल बिनहरकत रेटूं शकतील. एवढेंच नव्हे तर सदस्य नसलेल्याहि इसमास मुनीम नेमून सभेस उपस्थित राहून मतदानाचा हक्क त्यास नवीन कायद्यानें वापरतां येतो. अजिबात हितसंबंध नसलेल्या इसमास अशा रीतीनें 'प्रॉक्सी' देणें कितपत उचित आहे हें तज्ज्ञांनीं ठरवावें. पण अशा बाहेरच्या इसमाकडून संस्थेच्या हितरक्षणापेक्षा अवांतर बाबींवर जोर दिला जाण्याचा संभव आहे.

### दस्तऐवज दररोज दाखविण्याची सक्ति !

नवीन कायद्यानें कंपनीला कितीतरी रजिस्टरें, दस्तऐवज व नोंदी ठेवाव्या लागणार आहेत. मध्यम प्रतीच्या कंपन्या या बंधनामुळें मेटाकुटीस येतील. नुसती रजिस्टरें ठेवूनच भागत नाहीं, तर तीं रजिस्टरें, दस्तऐवज, अहवाल, नोंदी, करारमदार, भागांतील हितसंबंधीं डायरेक्टर वगैरे माहितीपत्रकें, प्रत्येक कामाच्या दिवशीं, शनिवारीं अगर अर्ध्यासुटीच्या दिवशींसुद्धा कमींत कमी दोन तास सभासद, स्वतःस सावकार म्हणविणारा, देणेकरी, कचित् प्रसंगीं कोणीहि इसम यांस पाहण्याचा नवीन कायद्यांत हक्क ठेवला आहे. ह्या नियमाचें परिपालन करणें किती जिकीरीचें आहे हें कंपनी चालविणारे इसमच सांगूं शकतील. पण कंपन्यांशीं स्पर्धा करणाऱ्या संस्था अगर उपद्रव्यापी व्यक्ति यांच्या हातांत या तरतुदीनें एक मोठें कोलीत पुरविलें आहे. हें रजिस्टर दाखविण्यास नाखुषी दर्शविल्यास व टंगळमंगळ केल्यास सदर कंपनी अथवा तिचा संबंधी अधिकारी गुन्ह्यास पात्र होतो. कांहीं ठिकाणीं तर पांच हजार रुपयेपर्यंतहि त्यास दंड होण्याची भीति आहे.

दस्तऐवज दाखविण्याचें दंडक कलम ४९ (८), ११८ (४), १४४ (२), १६३ (२), १७६ (७), १९६, २०९ (४) अशा २३ कलमांत दर्शविले आहेत. पुष्कळ वेळां या तरतुदींच्या सदुपयोगापेक्षा दुरुपयोग होण्याची भीति आहे. सक्तीपेक्षा संकेत व कायद्यापेक्षा प्रघात हीं अधिक चांगलीं ठरण्याचीं उदाहरणें आहेत.

### गैरसोयींत व अडचणींत वाढ

पण सर्वांवर ताण न्यायासन व न्यायदान यांच्या केंद्रीकरणानें केली आहे. ती अशी कीं, कोणाहि व्यक्तीला सुलभतया व वाजवी खर्चानें न्यायालयाकडून दाद मिळण्याची सोय करणें हें कायदे करणारांचें कर्तव्य होय. १९१३ च्या कंपनी कायद्याचें कलम ३ अन्वयें कंपनी कायद्याखालीं येणारे कोणतेहि दावे व उद्भवणारीं कोणतींहि प्रकरणें हायकोर्ट व मध्यवर्ती सरकारनें पसंत केलेलीं डिस्ट्रिक्ट कोर्टें यांना चालविण्याचा अधिकार दिला होता; कित्येक जिल्हा-कोर्टें प्रगल्भ अगर अनुभवी नसल्यास मध्यवर्ती सरकारनें त्यांना हे अधिकार बहाल केले नाहींत व तसें करणें सहाजिक व वाजवीहि होतें. पण नवीन कंपनी कायद्याचें कलम १० (२) (अ) व (ब) अन्वयें ह्या राज्यांतीलच नव्हे तर अखिल भारतांतील सबंध राज्यसंघांतील सर्व जिल्हा न्यायाधीशांना कंपनी कायद्याखालील कित्येक दावे व प्रकरणें चालविण्यास अपात्र ठरविलें आहे. कंपनीच्या कारभाराची चौकशी (कलम २३७), सभासद व सावकार यांच्याबरोबर व्यवस्था अगर तडजोड (क. ३९१), तडजोडीच्या माहितीसंबंधीं तरतूद (क. ३९३), गैरकारभार व जुलूम-त्रास टाळण्याची तरतूद (क. ३९७ ते ४०७) हीं प्रकरणें चालविण्यास कोणत्याहि जिल्हाकोर्टास मूलतः अजिबात हुकमत नवीन कायद्यानें ठेवली नाहीं. तसेंच एक लाखाच्यावर वसूल केलेल्या कंपन्यांचे भाग ७ खालीं येणाऱ्या म्हणजे कंपन्या नादारींत काढणें अगर स्वेच्छेनें त्या तशा निघणें व तदनुषंगिक बाबी यासंबंधी चौकशीसाठीं नुसतें प्रकरण चालविण्याचा नव्हे केवळ दाखल करून घेण्याचासुद्धा अधिकार कोणत्याहि जिल्हाकोर्टास आतां देण्यांत येणार नाहीं. पूर्वीच्या कायद्यांनीं त्यास हा अधिकार देतां येत होता व दिलाहि आहे; म्हणजे अहमदाबाद, पुणें, सोलापूर व बडोदा वगैरे ठिकाणच्या कंपन्यांच्या बाबतींत संबंधी इसमास सुलभतया व वाजवी खर्चानें दाद मिळत होती. ती सवलत अथवा हक्क ४३ वर्षांनंतर आतां नवीन कायद्यानें नष्ट केला आहे. राज्यपुनर्घटनेनें पूर्वींचीं २७ राज्यें हल्लीं १६ राज्यांत समाविष्ट झाल्यानें व प्रत्येकाचें क्षेत्र अधिक व्यापक झाल्यानें ही अडचण जास्त लोकांना व अधिक तीव्रतेनें जाणवेल. हा जादा खर्च, वेळ, दगदग, यायोगें कित्येक दुःखित अथवा असंतुष्ट नागरिक कोर्टाकडे जाण्यास धजावणार नाहींत व आपल्या नाकासमोर स्वतःच्या दृष्टीनें अनिष्ट प्रकार चालू ठेवणें त्यास प्राप्त होईल.

### श्रमविभाग ? नाहीं, केंद्रीकरण

याचे अनेक दृष्टींनें अनिष्ट परिणाम होणारे आहेत. मुंबई राज्यापुरतें बोलावयाचें झाल्यास, बेळगांवच्या उत्तर टोंकापासून कच्छ-सौराष्ट्रांपर्यंतच्या सदर कलमाखालीं येणाऱ्या बाबींबद्दल पक्षकारांस मुंबईस येऊन, जादा खर्च करून, फी भरून व मुंबईचा 'ओरिजिनल साईड' चा वकील देऊन अर्ज अगर दावा गुदरावा लागेल अगर बचाव करावा लागेल. जिल्हानिहाय न्यायाधीशांना व शहरांतील वकिलांना या बाबींसंबंधीं ज्ञान व अनुभव, काम चालविण्याची संधि व तदनुषंगिक पैसा मिळणार नाहीं. लिक्विडेटर्स वगैरे सर्व राजधानींतील रहिवाशी होणार व त्यांना तनखा मिळणार. कंपन्यांचीं रजिस्टरें, कागदपत्र, नोंदी या लांबून मुंबईस आणाव्या लागतील व व्यवस्थापक, संचालक, पक्षकार व साक्षीदार यांस आपल्या ठिकाणाहून राजधानीपर्यंत हेलपाटे घालावे लागतील. भरपूर द्रव्य नसलेल्यांच्या तक्रारी, वाचा न फुटता जागच्या जागीं मुरतील. अधिकाराचें व सत्तेचें विकेंद्रीकरण करावें हें आधुनिक कालाचें व लोकशाहीचें तत्त्व; पण जुन्या कायद्यानें केलेला श्रमविभाग रद्द करून व न्यायासनाचें विकेंद्रीकरण नष्ट करून सर्व एकच हायकोर्टांत केंद्रीकरण करून मध्यवर्ती सरकारनें काय मिळविलें ?

### चूक सुधारा

स्थानिक स्वराज्य-संस्थेस अधिकार द्यावे असा दावा राज्य-सरकारहि मान्य करतें. परंतु मध्यवर्ती सरकार आपल्या न्यायासनाच्या जिल्ह्याच्या मुख्य न्यायाधीशावरहि विश्वास टाकण्यास व त्यास संधि देण्यास तयार नाहीं. उलट, असलेले अधिकारच काढून घेतें ह्यास काय म्हणावें ? जिल्हा न्यायाधिशाचे निकाल हायकोर्ट फिरवितें म्हणून तो अजिबात नालायक असें कसें म्हणावें ? हायकोर्टाच्या एका जज्जाचा निकाल बेंच फिरवितें व फुल बेंचाचा निर्णय सुप्रीम कोर्ट कायम करतें अगर बदलतें. परंतु यामुळें जिल्हाकोर्ट, जिल्हा वकील, जिल्हाघटना, ह्या अपात्र ठरविणें म्हणजे विकेंद्रीकरणास व लोकशाहीस विरोध करणें होय. विशिष्ट जिल्हे तुम्ही वगळा; कांहीं जिल्ह्यांच्या मुख्य न्यायाधिशांसहि तुम्ही अधिकार द्या; तो अपरिपक्व अगर अननुभवी म्हणून देऊं नका, पण भारतांतील सर्व जिल्ह्यांतील सर्व जिल्हान्यायाधिश हे उपरिनिर्दिष्ट काम चालविण्यास अपात्र आहेत असें निवेदन कायद्याच्या कलमांत अनुस्यूत करणें युक्त नाहीं.

मुंबइ प्रांतिक सरकारनं जिल्हा शहरांचे ज्यु. डि. कोर्टांस शेतकरी कर्जनिवारण कायद्याचे अधिकार न देऊन अशीच चूक प्रथम केली होती. म्हणजे ज्यु. डि. कोर्टांस शेतकरी ऋणविमोचन कायद्याचे अर्ज चालवितां येत होते. पण जिल्हा-शहराचे अर्ज ज्यु. डि. कडे चालत नसत. हा अर्थशून्य फरक कांहीं वर्षांनीं प्रांतिक सरकारनें नष्ट केला. मध्यवर्ती सरकारनेंहि आपला दृष्टिकोन बदलून कंपन्या व त्यांचे सदस्य व ऋणको आणि धनको ह्यांची गैरसोय व संभाव्य कुचंबणा आपल्या कायद्यांत दुरुस्ती करून दूर करणें सर्व दृष्टींनीं अवश्य आहे.

—केसरी, ४-१-५७.

**आंतरराष्ट्रीय वसतिगृह**—लंडन विद्यापीठांत अभ्यास करणाऱ्या परदेशीय विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें वसतिगृह बांधण्यांत येणार आहे. आतांपर्यंत २८ देशांनीं मिळून ३ लाख पौंड दिले आहेत. भारतानें ३०,००० पौंड दिले असून ब्रिटननें २ लाख पौंड देण्याचें आश्वासन दिलें आहे.


# बँक ऑफ पूना लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) ३६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

—:व्याजाचे दर:—

चालू ठेव—अर्धा टक्का. सेव्हिंग्ज—दोन टक्के.
२ महिन्यांच्या पुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,५०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—यथायोग्य बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. देवेंद्र आपया मंगाज कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

# दक्षिण हिंदुस्तानांतील कापडाचा धंदा

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम., पुणें ५.

दक्षिण भारतांतली पहिली गिरणी बकिंगहॅम ही १८७८ त स्थापन झाली, नंतर सुएझपूर्व मोठी मदुरा व नंतर कोयमटूरच्या गिरण्या निघाल्या. पण खरी झपाट्यानें प्रगति १९३० च्या पुढें झाली. त्याला कारण म्हणजे पायकारा व मेटुर येथून स्वस्त वीज व कोयमटूर, रामनद, तिनेवेल्ली व मदुरा या जिल्ह्यांतून करुणगन्नी व कांबोडिया या उत्तम प्रतीच्या कापसाचा चांगला पुरवठा होऊं लागला. तसेंच मजूरहि स्वस्तांत मुबलक मिळत होते व पूर्वापार हातमागाचा मोठा धंदा चालू असल्यानें सुताला बाजार तयार होता. त्यामुळें सूतगिरण्याच जास्त वाढत गेल्या यांत नवल नाहीं. दुसऱ्या महायुद्धकालांत तर प्रगति फार झपाट्यानें झाली, व धंद्याचें बस्तानहि मजबूत पायावर बसवलें गेलें. शहाणपणाचा कारभार हें या मजबुतीचें कारण होय. १९५५ मध्यें भारतांत ४६१ कापडगिरण्या होत्या, पैकी दक्षिणेंत १२३. एकूण भारत व दक्षिण यांची तुलना पृष्ठाखालील तक्त्यांत केली आहे.

या तक्त्यावरून दिसून येईल कीं एकूण भारताच्या चात्यांपैकी २२·१६ टक्के चात्या दक्षिणेंत आहेत. म्हणजे सुतावर जोर जास्त आहे. माग मात्र साडेसात टक्केच पडतात.

पहिल्या पंचवार्षिक योजनेनें ठरवून दिलेले कापडाचें लक्ष्य आतांच साध्य झालेलें आहे. योजनेनें कापडाचे लक्ष्य ४७०० दशलक्ष वार, व सुताचें १६४० दशलक्ष रत्तल होतें. पण ३१ डिसेंबर १९५५ लाच, कापडाचें उत्पादन ५०९४ दशलक्ष वार व सुताचें १६३० दशलक्ष रत्तल उत्पादन झालेलें आहे. यांत दक्षिणेचा वांटा बराच मोठा आहे. भारतांत फाळणीनंतर ५३ गिरण्या निघाल्या; त्यापैकीं ३८ दक्षिणच्या आहेत. यापेक्षाहि प्रगति जास्त झाली असती. पण युद्ध आणि उत्तर कालांत यंत्रसामुग्रीचा पुरवठा व्हावा तितका होणें अशक्य झालें होतें. तसेंच अवर्षणामुळें वीजपुरवठ्यांतसुद्धां पन्नास टक्के घट होत होती. आतां पुष्कळ गिरण्यांनीं स्वतःचींच वीजनिर्मितीचीं यंत्रें टाकलीं आहेत.

भारतांत कापडाच्या धंद्यांत ११४ कोट रुपये भांडवल गुंतलें आहे. तें एकूण उद्योगांतल्या भांडवलाच्या १५ टक्के होतें, व उत्पादनाची किंमत ३५ टक्के पडते. देशांतला उत्पादित कापूस आपल्या गिरण्याच खपवितात, इतकेंच नव्हे तर सहा लाख गांठी (विशेषतः उत्तम प्रतीचा, अमेरिकन व ईजिप्तचा) परदेशांतून आयात कराव्या लागतात. सरकारला १९५४-५५ सालीं गिरण्यांपासून प्राप्तीवर दहा कोटी तर ४४ कोट रुपये पट्टीच्या रूपानें मिळाले. राज्य-प्रांतांना विक्रीकरापैकी २५ टक्के कापडापासून विक्रीकर मिळाला.

जगाशीं तुलना करतां, उत्पादनांत अमेरिका अग्रस्थानीं, भारत दुसरा, जपान तिसरा व इंग्लंड चौथा देश; निर्यातींत जपान पहिला व भारत दुसरा. अमेरिकेप्रमाणें भारताची अंतर्गत मागणीच फार मोठी आहे; त्यामुळें निर्यातीस जोर चढत नाहीं. भारताला निर्यात वाढवावयाची तर अग्रयावत् पद्धतीनें उत्पादन कमी खर्चानें, वाढवून, मालाचा दर्जा कायम ठेवून निर्यातीकरतां विशेष प्रयत्न केले पाहिजेत. युद्धकालीन मागणीमुळें वाढला गेलेला निर्यात व्यापार आतां राहिलेला नाहीं. जपान, जर्मनी, चीन, ब्रम्हदेश, पाकिस्तान व इतरहि अनेक देश कापडाचा धंदा वाढवीत आहेत व जागतिक चढाओढ तीव्रतर होत आहे. तेव्हां भारतीय उत्पादक व सरकार यांनीं जागरूक राहिलें पाहिजे.

एकूण भारत व दक्षिण यांचे सुताचें व कापडाचें उत्पादनाचें प्रमाण दशलक्षांत.

| | वर्ष | सूत | कापड |
|---|---|---|---|
| भारत एकूण | १९४९ | १,३५९·१ | ३,९०४·२ |
| | १९५२ | १,४४९·१ | ४,५९८·६ |
| | १९५५ | १,६३०·० | ५,०९४·४ |
| दक्षिण भारत— | १९५० | २२१·१ | १६६·३ |
| पाँदिचेरी सोडून | १९५२ | २२४·६ | १८२·१ |
| | १९५५ | ३२५·० | २३५·० |

यावरून दिसतें कीं, वीजपुरवठा कमी पडत असून सुद्धां दक्षिणची प्रगति चांगलीच चालू आहे. एकूण भारताच्या कापड व सुताच्या १९५५ च्या उत्पादनाशीं दक्षिणेचें प्रमाण अनुक्रमें ४·६ व २० टक्के पडतें.

मुंबई-अहमदाबाद येथील मालक-मजूर संबंध दक्षिणेच्या मानानें जास्त चांगले आहेत. बोनस कसा व किती यावयाचा हें तेथें लेबर अपेलेट ट्रिब्यूनलनें पांच वर्षेपर्यंत ठरवून दिलेलें आहे. दक्षिणेंत मात्र दरवर्षीं हा प्रश्न पुढें येऊन बोनसचा निकाल देण्यांत येतो व धंदा आणि बोनस यांचा ठराविक पद्धतीशीं मेळ बसवला जात नाहीं.

१९५५ साल गिरण्यांना चांगलें गेलें. १९५६ च्या पहिल्या दहा महिन्यांचें दाक्षिणेंतील उत्पादनहि समाधानकारक असून ४० टक्के नफा जास्त यावा. पण १९५६ च्या १ ऑक्टोबर पासून मूळ मजुरींत १६ टक्के वाढ करण्यांत आलेली आहे व

| — | एकूण गिरण्या | एकूण चात्या | मागांची संख्या | कामगार | वापरलेला कापूस (गांठी) |
|---|---|---|---|---|---|
| आंध्रसह मद्रास | ९९ | २२,२०,९८६ | ९,३५५ | ५९,८७५ | ७,८४,१८२ |
| म्हैसूर | ११ | २,३२,८४४ | ३,४५६ | ११,९४२ | १,००,८५४ |
| त्रावणकोर-कोचीन | १० | १,३५,६९६ | ७१८ | ३,७६१ | ४९,६६० |
| पाँदिचेरी | ३ | ८४,४८४ | २,०८९ | ३,४३७ | २३,०८६ |
| एकूण द. भारत | १२३ | २६,७४,०१० | १५,६१८ | ७९,०१५ | ९,५७,७८२ |
| एकूण भारत | ४६१ | १,२०,६८,५४४ | २,०७,३४७ | ४,२३,५९५ | ४७,९७,०८४ |

१९५५ चा वाढवून दिलेला बोनस १९५६ च्या उत्पन्नांतून देणेचा आहे. त्यामुळें इतका नफा उरणार नाहीं. तरीपण गुंतविणारांचें डिव्हिडंड कायम राहण्यास हरकत नाहीं. दक्षिणेंत युद्धोत्तरकालांत गिरण्यांनीं स्वतःच्याच पैशांनीं उत्पादनवाढीचे कार्यक्रम अंमलांत आणलेले आहेत व यंत्रसामुग्री नवी आहे. तसेंच स्वतःचीं यंत्रें बसवल्यानें वीजपुरवठ्यांतहि खंड पडणार नाहीं.

दक्षिणेकडील गिरण्यांच्या शेअर्समध्यें पैसे गुंतविणें फायद्याचें ठरावें. गुंतवतांना पुढील कसावर गिरणीचा विचार करावा.

( १ ) भांडवल ( २ ) दर चाती व माग यामागें होणारें नफ्याचें प्रमाण ( ३ ) आवरासावरी प्रसंगीं येणारी किंमत ( ४ ) 'ऑर्डिनरी' भांडवलापासूनचें वट उत्पन्न ( ५ ) पैशाची परिस्थिति ( ६ ) उधळपट्टीविना सालोसाल दिलेलें स्थिर डिव्हिडंड ( ७ ) व्यवस्थित कारभार ( ८ ) उत्पादनवाढीचा कार्यक्रम.

हे कस लावून पाहतां गुंतविण्याच्या दृष्टीनें दक्षिणेंतील, बकिंगहॅम, बंगलोर वुलन, मेहूर, मदुरा, लक्ष्मी, राजलक्ष्मी, इत्यादि गिरण्या उत्कृष्ट आहेत.

( आधार: टेक्स्टाईल इंडस्ट्री इन् सौथ इंडिया, १९५६. दलाल आणि कं. मद्रास. )

## फुटबॉल खेळाडूला किताब

इंग्लंडमधील सुप्रसिद्ध फुटबॉलपटू स्टॅनले मॅथ्यूस ह्याला एलिझाबेथ राणीनें सी. बी. ई. ( कमांडर ऑफ दि ऑर्डर ऑफ दि ब्रिटिश एंपायर ) हा किताब नव्या वर्षाचे प्रारंभीं दिला आहे. 'सरदार'कीच्या एक पायरी खालचा हा किताब आहे. फुटबॉलच्या जगांत 'विंग फॉरवर्ड' जागीं घडाडीनें खेळणाऱ्या ह्या पटूला खूपच मान आहे आणि प्रतिस्पर्धी त्याला नेहमीं भीत असतात. त्याचें वय ४१ वर्षांचें आहे.

## हाली चलनाचा शेवट

१ जानेवारी, १९५७ पासून हाली रुपयाचा 'चलन' पणा नष्ट झाला. ३१ डिसेंबर, १९५६ हा हाली रुपये देऊन हिंदी रुपये घेण्याचा अखेरचा दिवस होता. त्या दिवशीं बँकांना सुट्टी होती, तरी ह्या अदलाबदलीचें काम त्यांनीं चालू ठेवलें होतें. १ एप्रिल, १९५३ रोजीं हाली चलन बंद करण्यांत आलें. त्यावेळीं ६२ कोटी रुपयांचें हाली चलन देवघेवींत होतें. सुमारें १ कोटी हाली रुपये अद्याप तसेच राहिले आहेत. पूर्वीच्या हैद्राबाद राज्याच्या मराठवाडा, कर्नाटक आणि तेलंगण विभागांत ते प्रसृत झालेले आहेत. सात हाली रुपये = सहा हिंदी रुपये, अशी हुंडणावळ होती.

## बॉंबे को. हाउसिंग फायनान्स सोसायटी लि.

वरील केंद्रीय सोसायटीजवळ सभासद-सोसायट्यांना कर्ज देण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध नसल्या कारणानें, नव्या घरबांधणीस खूपच अडथळा आला आहे. सोसायट्यांच्या डायरेक्टरांनीं सभासदांना कर्जें मंजूर केलीं, तरी तीं देण्याला पैसाच नाहीं, अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. कांहींना कर्जें मंजूर झालीं तरी मिळूं शकलीं नाहींत. त्यामुळें घरबांधणीच्या कामांत खंड पडला आहे. डिबेंचर्सच्या द्वारां बॉंबे को. हाउसिंग सोसायटीनें पैसा उभारला, तरच कांहींतरी प्रगति शक्य होईल.

## पुढे पाऊल

लेखक : श्री. वा. काळे, ( दुर्गाधिवास, पुणें ४ )

श्री. काळे ह्यांनीं समाजाला 'आपण चुकतों कोठें ?' हें दासविण्यासाठी हें पुस्तक लिहिलें. त्यांचें पहिलें सर्वांना प्रिय झालेलें पुस्तक 'कण आणि क्षण'. ज्यांनीं 'कण आणि क्षण' हें पुस्तक वाचलें आहे, त्यांना श्री. काळे यांचा लेखक म्हणून केवढा अधिकार आहे, हें सांगण्याची गरज नाहीं. 'किर्लोस्कर', 'केसरी', 'स्त्री', 'सह्याद्रि', 'उद्यम', वगैरे नियतकालिकांमधून जे लेख प्रसिद्ध झाले ते एकत्र करून वाचकांचे हातीं पुस्तकरूपानें दिले आहेत. स्वराज्यांत प्रत्येक समाजानें व कुटुंबानें सुधारण्याचा प्रयत्न केला तर भारतासारखा मोठा देश सुधारणार आहे. कुटुंबांतील खाजगी वाचनालयामध्यें या पुस्तकाची प्रत असणें अवश्य आहे. पुस्तक आपण वाचावें व शेजाऱ्यास वाचावयास द्यावें व त्यांत चर्चिलेल्या गेलेल्या प्रश्नांवर सर्वांनीं बसून चर्चा करावी. पृष्ठसंख्या १३१ किं. २ रुपये.

—'शिक्षक', जानेवारी, १९५७.

## इंग्लंडमधीलहि किंमती वाढल्या

चहाच्या किंमतीस कांहीं प्रकारच्या चहांच्या बाबतींत पौंडामागें ८ पेन्स वाढ झाली आहे. साखरेची किंमतहि वाढण्याच्या मार्गावर आहे. टेलिफोनच्या लोकल कॉलसाठी ३ पेन्स ऐवजीं ४ पेन्स पडूं लागले आहेत. सुएझ कालव्याच्या बंदीचा हा परिणाम आहे, असें सांगण्यांत येत आहे.

## गंगा नदीवरील धरणास पाकिस्तानचा विरोध

पश्चिम बंगालमध्यें फरुकाबाद येथें गंगा नदीवर धरण बांधण्यांत यावयाचें आहे, त्याला पाकिस्ताननें आपला विरोध दर्शविला आहे. एकापेक्षां अधिक देशांतून वहाणाऱ्या नदीला धरण बांधण्याविषयक "बार्सिलोना कनव्हेन्शन" आहे, त्याचा आधार पाकिस्तान घेऊं इच्छित आहे.

## बँकेच्या रौप्यमहोत्सवाचे प्रसंगीं चेअरमनचा मृत्यु !

शामराव विठ्ठल को. बँकेचा रौप्यमहोत्सव मुंबई येथें दि. २९ डिसेंबर, १९५६ रोजीं साजरा होत असतांना, समारंभाचे वेळीं बँकेचे चेअरमन, श्री. डी. व्ही. नाडकर्णी, हे दूरध्वनिक्षेपकाजवळ जाऊन भाषण करणार, इतक्यांत मृत्यु येऊन खाली पडले ! ते ३१ वर्षें बँकेचे संचालक व ८ वर्षें चेअरमन होते.

## हिटलरच्या मृत्यूची नोंद झाली

हिटलरचें नांव बर्लिन येथील मृत लोकांच्या यादींत २८ डिसेंबर, १९५६ रोजीं २९,०५० ह्या नंबरासमोर लिहिण्यांत आलें. अशा रीतीनें, हिटलर हा अधिकृत रीत्या मृत्यु पावला आहे.

## रशिआंतील पोष्टाच्या तिकिटावर कालिदासाचें चित्र

"भारताचा सुप्रसिद्ध कवि कालिदास ह्याच्या सन्मानार्थ" रशिआनें पोस्टाचें एक नवें तिकीट सुरू केलें आहे. हिंदी पार्श्वभूमीवर, रशिआंत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें त्या तिकिटावर चित्रित केलीं आहेत.

## विदेशी फर्म्समधील हिंदी नोकर

### संख्येंत व प्रमाणांत वाढ

भारतांतील विदेशी फर्म्समधील हिंदी नोकरांची संख्या व त्या संख्येचें फर्म्समधील एकूण नोकरांशीं प्रमाण हळुहळु वाढत आहे. ३०० ते ४९९ रु. व ५०० ते ९९९ रु. ह्या पगारांच्या गटांतील बहुतेक सर्व नोकर आतां हिंदीच आहेत. १ जानेवारी, १९५६ रोजींची त्यापेक्षा वरिष्ठ नोकरांची परिस्थिति खालील-प्रमाणें होती :—

| वर्ष | हिंदी नोकर | विदेशी नोकर | एकूण |
|---|---|---|---|
| १९४७ | ५०४ | ५,८४४ | ६,३४८ |
| १९४८ | ७४२ | ६,३६० | ७,१०२ |
| १९४९ | १,०८५ | ६,७०९ | ७,७९४ |
| १९५० | १,४०६ | ६,८७१ | ८,२७७ |
| १९५१ | १,७८४ | ६,९५३ | ८,७३७ |
| १९५२ | २,२९१ | ७,१०४ | ९,३९४ |
| १९५४ | ३,३४६ | ७,००८ | १०,३५४ |
| १९५५ | ३,९९५ | ६,८१० | १०,८०५ |
| १९५६ | ४,६८५ | ६,५६६ | ११,२५१ |

१ जानेवारी, १९५५ च्या मानानें १ जानेवारी, १९५६ रोजीं विदेशीयांचें प्रमाण सर्वच दर्जाच्या नोकरांचे बाबतींत घटलें आहे. १,००० ते १,५०० रु. दरमहाच्या नोकरांत हिंदी नोकरांचें प्रमाण आतां दोन तृतीयांशापेक्षा अधिक आहे; १९५४ मध्यें तें ५४·९% व १९५५ मध्यें २१·५% होतें. १,५०१ ते ३,००० रु. दरमहाच्या नोकरांपैकी एक तृतीयांश हिंदी आहेत; १९५४ मध्यें त्यांचें प्रमाण २३·०% व १९५५ २७·४% होतें. त्यापेक्षा जास्त पगारांच्या नौकरांपैकी फक्त १०% हिंदी आहेत. पण १९५४ मध्यें ते फक्त ६·५% व १९५५ मध्यें ७·९% होते.

१,००० रुपयांपेक्षा जास्त दरमहा पगाराच्या ६,५६६ विदेशी नौकरांपैकी ८७·६% नोकर ब्रिटिश आहेत. अमेरिकन फक्त ३·९% असून त्यांची संख्या २२७ आहे. स्विस नोकरांची संख्या १०८ आहे.

### अमरिकेंतील मोटारींचें उत्पादन

जनरल मोटर्स, फोर्ड आणि क्राइसलर ह्या तीन मोठ्या अमेरिकन मोटार कंपन्यांनीं मिळून १९५६ मध्यें ५६,०१,८५४ मोटारगाड्या तयार केल्या. त्यांची वाटणी अशी :—

| कंपनी | गाड्यांची संख्या |
|---|---|
| जनरल मोटर्स ( शेवरोलेट, पाँटिॲक, ब्यूक, ओल्ड्समोबाइल व कॅडिलॅक गाड्या ) | ३०,६२,४२८ |
| फोर्ड ( फोर्ड, मर्क्युरी, लिंकन आणि काँटिनेंटल गाड्या ) | १६,६९,१६५ |
| क्राइसलर ( प्लायमथ, डॉज, डि सोटो, क्राइसलर व इंपेरिअल गाड्या ) | ८,७०,२६१ |
| | ५६,०१,८५४ |

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

### ठेवींत सव्वा कोटी रु. ची भर; ४ लक्ष रु. नफा; डिव्हिडंडमध्यें १% वाढ

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेडला १९५६ सालीं सर्व खर्च भागून, नोकरवर्गास बोनस देण्यासाठी रुपये ६०,००० ची तरतूद करून ( मागील वर्षीं ही तरतूद रु. ३३,००० होती ) व इतर आवश्यक व नित्याच्या तरतुदी करून ( ऑडिट व्हावयाचें आहे, ) निव्वळ नफा रु. ३,९९,५८५ इतका झाला. मागील वर्षाचे नफ्यापेक्षा ही रक्कम रु. ५३,७९० नें अधिक आहे. १९५५ सालांतील पुढें ओढलेली नफ्याची रक्कम रु. ३१,७४४ यांत मिळविली असतां ऐकूण रु. ४,३१,३२९ इतका नफा वांटणी करण्यासाठी उपलब्ध होतो. त्याची विभागणी पुढीलप्रमाणें करण्याचें संचालकांनीं योजिलें आहे.

| | |
|---|---|
| इन्कमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी तरतूद : | १,८०,००० रु. |
| रिझर्व्ह फंडांत जमा : | १,२५,००० रु. |
| शेअर्सवर ६ टक्के करमाफ डिव्हिडंड : | ९६,००० रु. |
| पुढील वर्षीच्या हिशेबांत दाखल : | ३०,३२९ रु. |
| | ४,३१,३२९ रु. |

बँकेनें गेलीं १२ वर्षे ५ टक्के डिव्हिडंड दिलें आहे; ठेवींत या वर्षी जवळ जवळ सव्वा कोटी रुपयांची वाढ होऊन त्यांची रक्कम रु. ५,०६,३१,००० वरून रु. ६,२५,००,००० वर गेली व एकूण खेळतें भांडवल रुपये ५,८६,४०,००० वरून रुपये ७,३०,००,००० वर गेलें. संकलित नफावांटणीनंतर बँकेची एकूण गंगाजळी १० लक्ष रुपये होईल. वसूल भाग भांडवल १६ लक्ष रु. आहे.

### को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेजचें कार्य

को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज, पुणें, ह्या संस्थेनें आपल्या कार्याची माहिती देणारी एक ६५ पृष्ठांची पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. कॉलेजच्या स्थापनेची पूर्वपीठिका प्रथम देऊन, कॉलेजच्या वाढीची माहिती देण्यांत आली आहे. त्यानंतर कॉलेजच्या शिक्षणक्रमाचा तपशील दिलेला आहे. कॉलेजला अखिल भारतीय सहकारी शिक्षणकेंद्राचा दर्जा आतां मिळालेला आहे. प्रो. पी. एम. चेंगाप्पा हे कॉलेजचे प्रिन्सिपॉल असून कॉलेज कमिटीचे सभासद-चिटणीस आहेत; श्री. वैकुंठराय मेहता हे चेअरमन आहेत.

### महाराष्ट्राचें आर्थिक दर्शन

महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेच्या निमित्तानें, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा ह्या सर्व मराठी विभागांचें आर्थिक चित्र देणारें हें पुस्तक महाराष्ट्र चेंबरनें तयार केलें आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचीं जीं विविध अंगें आहेत, त्या सर्वांबद्दल शक्य तेवढी आकडेवार माहिती देण्याचा त्यांत प्रयत्न करण्यांत आला आहे; भारताशीं व इतर प्रमुख राज्यांशीं तुलना करतां यावी ह्यासाठीं तुलनात्मक माहितीहि देण्यांत आली आहे. पुस्तकाचा मुख्य उद्देश विद्यमान परिस्थितीचें चित्र रेखाटणें हा आहे; संभाव्य विकास व भावी विकासयोजना ह्याबद्दल विवेचन सहाजीकच त्यांत आलेलें नाहीं. ( पृ. सं. ४६. किं. ३ रु. प्रकाशक : रा. ग. मोहाडीकर, सेक्रेटरी, महाराष्ट्र चेंबर, १२, राम्पार्ट रोड फोर्ट, मुंबई. )

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.